**महिला कला–वाणिज्य महाविदयालय चांदुर (रेल्वे)**

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर**

**दत्तक ग्राम– बागापूर तालुका– चांदुर रेल्वे**

**दिनांक ६/०२/२०२४ ते १३/०२/२०२४**

**अहवाल**

........................................................................................................................................

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिला कला–वाणिज्य महाविदयालय चांदुर–रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक ६/०२/२०२४ ते १३/०२/२०२४ या कालावधीत दत्तक ग्राम बागापूर, येथील संत खप्ती महाराज आश्रम येथे संपन्न झाले. या विशेष शिबिराचा अहवाल पुढील प्रमाणे:

१. **मंगळवार, दिनांक ६/०२/२०२४** रोजी महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थीची नोंदणी, शिबिराची पूर्वतयारी करण्यात आली. सायंकाळच्या सत्रामध्ये गावकयांशी चर्चा करण्यात आली. शिबिरार्थी व गावकरी यांचा परिचय झाला.

२. **बुधवार, दिनांक ७/०२/२०२४** रोजी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उदघाटन महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी उद्घाटक म्हणून सन्माननीय श्री. निरंजन चौधरी अध्यक्ष संत खप्ती महाराज आश्रम बागापूर, प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सौ. प्रियंका चौधरी, यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी गावातील प्रतिष्ठित मंडळी व महाविदयालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

३. **गुरूवार, दिनांक ८/०२/२०२४** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, श्रमदान, या दिनचर्येनंतर बौदिधक सत्रामध्ये दुपारी २.००वाजता 'भारतीय संविधान आणि आपली जबाबदारी' या विषयावर श्री. सुरेश वानखडे यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. प्रदीप दंदे हे होते. या बौदिधक सत्राला शिबिरार्थी व गावातील गावकरी उपस्थित होते.

४. **शुक्रवार, दिनांक ९/०२/२०२४** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे 'मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर जनजागृती करण्यात आली. दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली. तसेच बौदिधक सत्रात दुपारी २.०० वाजता 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' या विषयावर प्रा. गजानन सैरिसे यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. अतुल वानखडे हे होते. या सत्रात शिबिरार्थ्यांसोबत गावातील शालेय विदयार्थी उपस्थित होते.

५. **शनिवार, दिनांक १०/०२/२०२४** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे ‘व्यसनमुक्तीवर’ जनजागृती करण्यात आली. दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली. बौदिधक सत्रात दुपारी २.०० वाजता आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. अमित बेलसरे ग्रामीण रूग्णालय चांदुर रेल्वे यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. विजय कापसे हे होते. यात शिबिरार्थी व गावातील गावकरी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

६. **रविवार, दिनांक ११/०२/२०२४** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ या विषयावर जनजागृती करण्यात आली. दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली बौदिधक सत्रात दुपारी २.०० वाजता ‘अंधश्रद्धा निर्मूलन’ या विषयावर प्रा. विनय मिरासे व रूपेश वानखडे यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. संजीव भुयार हे होते. रात्री ‘आकाश निरीक्षण’ हा कार्यक्रम भूगोल विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. यात शिबिरार्थी व गावातील शालेय विदयार्थी सहभागी झाले होते.

७. **सोमवार, दिनांक १२/०२/२०२४** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे एडस‘’ या विषयावर जनजागृती करण्यात आली. या दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली. बौदिधक सत्रात दुपारी २.०० वाजता ‘महिला मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. त्यात ‘आहार विषयक मार्गदर्शन व महिला सक्षमीकरणाची गरज’ या विषयावर प्रा. रूपाली इंगळे यांनी मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्ष डॉ. सीमा जगताप हया होत्या. या सत्रात शिबिरार्थी व गावातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. या नंतर समारोपीय कार्यक्रमाची सुरूवात झाली. समारोपीय कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यात आली. दुपारी ४.००वाजता समारोपीय समारोह संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. निरंजन चौधरी, अध्यक्ष संत खप्ती महाराज आश्रम बागापुर व गावातील प्रतिष्ठित मंडळी तसेच महाविदयालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

८. **मंगळवार, दिनांक १३/०२/२०२४** ग्रामस्थांशी चर्चा करून निरोप घेण्यात आला.

कार्यक्रम अधिकारी
(प्रा. अनिता एस. धुर्वे)

प्राचार्य
(डॉ. अशोक पळवेकर)

....................................

# विशेष शिबिर कार्यक्रम फोटो

## राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्‌घाटन कार्यक्रम






पथनाटयाच्या माध्यमातून जनजागृती करतांना रोसेयो स्वयंसेवक




ग्राम स्वच्छता करतांना रोसेयो स्वयंसेवक




NIKE


STYLISH



बौदिधक सत्र ' भारतीय संविधान व आपली जबाबदारी' मार्गदर्शन करतांना



## रासेयो स्वयंसेवकांना योग मार्गदर्शन करतांना



## आरोग्य तपासणी शिबिर






‘आकाश निरीक्षण’ कार्यक्रम भूगोल विभागाच्यावतीन प्रा. संजीव भुयार सर



‘अंधश्रद्धा निर्मूलन’ विषयावर प्रा. विनय मीरासे व रूपेश वानखडे मार्गदर्शन करतांना



महिला मेळावा




रोसेयो विशेष शिबिराचे समारोपीय कार्यक्रम


महिला कला-वाणिज्य महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारा आयोजित
विशेष श्रमसंस्कार शिबिर
।। युवा भारत - विकसित भारत, सशक्त भारत ।।
vivo Y21G
Feb 12, 2024, 15:50



वृतपत्र कात्रण

# बागापूर येथे महिला महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्‌घाटन



चांदूर रेल्वे दि. ७ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला - वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन नुकतेच पार पडले. दि. ६ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे बागापूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन श्री संत खप्ती महाराज आश्रमाचे अध्यक्ष निरंजनजी चौधरी यांच्या हस्ते दि. ७ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. यावेळी समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर होते. उपस्थित शिबिरार्थींना त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रारंभी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी बागापूर ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. प्रियंका विवेक चौधरी, डॉ. सीमा जगताप, डॉ. विजय कापसे यांनीही आपले विचार मांडले. या समारंभाला प्रा. संजीव भुयार, प्रा. अतुल वानखडे, प्रा. नितीन अंभोरे, प्रा. नीलिमा थोरात, प्रा. रश्मी खेडकर, प्रा. मृणाली वानखडे, प्रा. नीलिमा टिचुकले, कु. पूजा देशमुख यांच्यासह रजनी वघवे, रेखा मेश्राम आणि अनिल शास्त्रकार हे शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतुल वानखडे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. अश्विनी बनकर यांनी केले.

# चांदुर रेल्वे येथील महिला महाविद्यालयाच्या रासेयो विशेष शिबिराचा समारोप



चांदुर रेल्वे दि. १३ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला - वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या मंगळवार, दि. ६ फेब्रुवारी ते मंळवार, दि.१३ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत दत्तकग्राम बागापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप नुकताच पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर होते.

या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या नियोजित कार्यक्रमानुसार मंगळवार, दि.६ फेब्रुवारी रोजी शिबिरार्थींचे दुपारी दोन वाजता बागापूर येथे आगमन झाल्यानंतर शिबिराची पूर्वतयारी, परिसर स्वच्छता व गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली. दुसऱ्या दिवशी दि. ७ फेब्रुवारी रोजी प्राचार्य डॉ अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि सरपंच सौ. प्रियंका चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत निरंजनजी चौधरी यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

त्यानंतर इतर दिवशीच्या नियमित कार्यक्रमांत प्रार्थना, प्राणायाम व योगाभ्यास, श्रमदान, बौद्धिक सत्र आणि सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. दरदिवशी आयोजित करण्यात आलेल्या बौद्धिक सत्रात सुरेश वानखेडे (भारतीय संविधान आणि आपली जबाबदारी), गजानन सैरिसे (स्पर्धा परीक्षा), डॉ. अमित बेलसरे (आरोग्य तपासणी शिबिर), प्रा. विनय मिरासे व रुपेश वानखडे (अंधश्रद्धा निर्मूलन), रुपाली इंगळे (ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न) यांनी संबंधित विषयांवर त्यांचे विचार मांडले. या बौद्धिक सत्रांचे अनुक्रमे डॉ. प्रदीप दंदे, डॉ. अतुल वानखडे, डॉ. विजय कापसे, प्रा. संजीव भुयार, डॉ. सीमा जगताप यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्रा. संजीव भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली आकाश निरीक्षण या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नितीन अंभोरे यांचा सहभाग होता.

गावातील महिलांना आहारविषयक मार्गदर्शन करण्यासाठी या शिबिरात 'महिला मेळाव्या'चेही आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात रश्मी खेडकर, नीलिमा टिचुकले, मृणाली वानखेडे, अश्विनी बनकर, प्रियंका राऊत, रुपाली इंगळे यांचा सहभाग होता.

शिबिराचा समारोप समारंभ पार पडल्यानंतर शेवटच्या दिवशी शिबिरार्थींनी ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांचा निरोप घेतला.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे, रासेयोचे सर्व समिती सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो गटप्रमुख निर्जला वासनिक, अनुष्का गुल्हाणे तसेच प्रा. प्रदीप दंदे, डॉ. विजय कापसे, प्रा. संजीव भुयार, डॉ. अतुल वानखडे, प्रा. नितीन अंभोरे यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वी झाले. डॉ. सीमा जगताप, प्रा. रश्मी खेडकर, प्रा. नीलिमा टिचुकले, प्रा. मृणाली वानखडे, पूजा देशमुख, प्रा. अश्विनी बनकर, प्रियंका राऊत यांच्यासह संदीप झोडे, अनिल शास्त्रकार, रेखा मेश्राम, रजनी वघवे यांचेही या शिबिराच्या यशस्वितेसाठी सहकार्य लाभले.

या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात बागापूर येथील श्री संत खप्ती महाराज आश्रमाचे अध्यक्ष निरंजनजी चौधरी, विश्वस्त आबासाहेब भोगे, नरेंद्रजी मोर आणि गंगाधरजी बावणे तसेच व्यवस्थापक वासनिक, सरपंच सौ. प्रियंका चौधरी, उपसरपंच सौ. सुचिता बोंद्रे, पोलिस पाटील दिनेश चौधरी, ग्रामस्थ सुरेशजी चौधरी आणि आश्रम परिसरातील व समस्त गावकरी मंडळी यांनी शिबिराच्या आयोजनासाठी केलेल्या मौलिक सहकार्याबद्दल त्यांचे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनीआभार मानले.